# मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ

## (म्हाडाचा घटक)

म्हाडा लॉटरी २०१९

म्हाडा
MHADA

# सदनिका विक्रीची जाहिरात - २०१९

**म्हाडाच्या सदनिका विक्रीसाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळ्यांची विक्री, हस्तांतरण व अदलाबदल) विनिमय, १९८१ आणि म्हाडा (जमिनीची विल्हेवाट) नियम १९८१ यामधील तरतुदीनुसार, विविध योजने अंतर्गत २१७ सदनिका विक्रीची जाहिरात मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे घोषित करण्यात येत आहे.**

## अर्जदारांची नोंदणी, ऑनलाईन अर्ज भरणे व स्विकृतीचे वेळापत्रक

(१) अर्जदारांची नोंदणी आणि अर्ज सादर करण्याचा दिनांक **०७/०३/२०१९ दुपारी २.०० वा. पासून ते १३/०४/२०१९ रात्री ११.५९ वा. पर्यंत.** (२) एनईएफटी / आरटीजीएस पेमेंट तारीख : **०७/०३/२०१९ ते १३/०४/२०१९** (संबंधित बँकेच्या कामकाजाच्या दिवशी आणि वेळी) **(३)** डेबिट कार्ड/क्रेडिट कार्ड, इंटरनेट बँकिंग स्वीकृती तारीख आणि वेळ : **०७/०३/२०१९ रोजी १४.०० वा.पासून** ते **१३/०४/२०१९ रोजी २३.५९ वा.पर्यंत. (४)** प्रस्तावित सोडतीचा दिनांक **२१/०४/२०१९ सकाळी १०.०० वाजता.**

## ऑनलाईन अर्ज शुल्क ₹ ३३६/- (अर्ज शुल्क ₹ ३००/- + जी.एस.टी @ १२% ₹ ३६/- विना-परतावा)

| अ. क्र. | योजनेचा क्रमांक | योजनेचे नाव आणि पत्ता | सदनिकेचे वर्णन | उत्पन्न गट | सदनिकेचे चटई क्षेत्रफळ (चौ. मीटर) | सदनिकेची अंदाजित विक्री किंमत (रुपये) | अनामत रक्कम + अर्ज शुल्क ₹ ३३६/- (अर्ज शुल्क ₹ ३००/- + जी.एस.टी @ १२% ₹ ३६/- | अनुसूचित जाती आणि नवबौद्ध | अनुसूचित जमाती | भटक्या जमाती | विमुक्त जमाती | पत्रकार | स्वातंत्र्य सैनिक | अंध व शारिरीक दृष्ट्या अपंग | संरक्षण दल किंवा सीमा सुरक्षा दलातील लढाईत मृत झालेल्या व्यक्तीचे कुटुंबीय अथवा लढाईत जखमी होऊन अपंग झालेले कर्मचारी | माजी सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती | महाराष्ट्रातील मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करणारे संसदेचे विधानसभेचे व विधान परिषदेचे आजी-माजी सदस्य | म्हाडा कर्मचारी (ज्यांची ५ वर्ष सेवा क्रम प्राप्त) | राज्य शासकीय कर्मचारी आणि संबंधित मंडळ महामंडळे इ. चे कर्मचारी (ज्यांची सेवा ५ वर्षे पूर्ण झाली आहे. यात यापूर्वी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा समावेश आहे) | शासकीय निवासस्थानामध्ये राहणारे आणि तीन वर्षांत सेवानिवृत्त होणार आहेत किंवा अगोदरच सेवा निवृत्त झाले असतील असे केंद्र सरकारचे कर्मचारी | कलाकार | सर्व साधारण जनता | विक्रीसाठी उपलब्ध एकूण सदनिका |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ |
| १ | ४०६ | शेल टॉवर कॉ.हौ.सो.लि., बिल्डिंग नं. ०२, सहकार नगर, चेंबूर, मुंबई - ४०००७१ | १बीएचके | अल्प | ३३.३० | ३२३५८४० | २०३३६ | ७ | ४ | १ | १ | २ | २ | २ | १ | ३ | १ | १ | ३ | १ | १ | ३४ | ६४ |
| २ | ४०७ | शेल टॉवर कॉ.हौ.सो.लि., बिल्डिंग नं. २३, सहकार नगर, चेंबूर, मुंबई - ४०००७१ | १बीएचके | अल्प | ३३.४५ | ३२५५१७० | २०३३६ | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | १ | २ | ० | १ | २ | १ | १ | २० | ४१ |
| ३ | ४०८ | शेल टॉवर कॉ.हौ.सो.लि., बिल्डिंग नं. २३, सहकार नगर, चेंबूर, मुंबई - ४०००७१ | १बीएचके | अल्प | ३५.४८ | ३४३३५२० | २०३३६ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | ८ | १३ |
| ४ | ४०९ | शेल टॉवर कॉ.हौ.सो.लि., बिल्डिंग नं. ३७, सहकार नगर, चेंबूर, मुंबई - ४०००७१ | १बीएचके | अल्प | ३२.४१ | ३१५४१०० | २०३३६ | ६ | ३ | १ | १ | १ | १ | २ | १ | ३ | १ | १ | ३ | १ | १ | २६ | ५२ |
| ५ | ४१० | शेल टॉवर कॉ.हौ.सो.लि., बिल्डिंग नं. २३, सहकार नगर, चेंबूर, मुंबई - ४०००७१ | १बीएचके | मध्यम | ४३.२६ | ३९६४९०० | ३०३३६ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ६ | ४११ | बिल्डिंग नं. ८, आदि शंकराचार्य मार्ग, कोपरी, पवई | २बीएचके | मध्यम | ६४.६१ | ५६७३८०० | ३०३३६ | ५ | ३ | १ | १ | १ | १ | १ | १ | २ | १ | १ | २ | १ | १ | २४ | ४६ |
| | | **एकूण** | | | | | | **२४** | **१४** | **४** | **४** | **५** | **५** | **७** | **४** | **११** | **३** | **४** | **११** | **४** | **४** | **११३** | **२१७** |

**नोंद : सर्व सदनिकांचे भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त आहे.**

## पात्रतेचे निकष

१) अर्ज सादर करावयाच्या दिवशी अर्जदाराचे वय १८ वर्षा पेक्षा जास्तअसणे आवश्यक आहे.

२) अर्जदार किंवा त्याची पत्नी / पती किंवा त्यांची अज्ञान मुले यांच्या नावे मालकी तत्वावर, भाडे खरेदी पद्धतीवर अथवा नोंदणी कृत सहकारी गृहनिर्माण संस्थेचा सदस्य म्हणून बृहन्मुंबई महानगर पालिका (MCGM) हद्दीत म्हाडाने वितरीत केलेला किंवा खाजगीरित्या संपादित केलेला निवासी गाळा / निवासी भूखंड नसावा.

३) जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून महाराष्ट्रातील मागील सलग २० वर्षांच्या कालावधीत महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही भागामध्ये, अर्जदाराने किमान १५ वर्षाचे वास्तव्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) / रहिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. (केंद्रशासन कर्मचारी (CG), प्रवर्ग-आरक्षण वगळून).

४) अर्जदाराचे सरासरी मासिक कौटुंबिक उत्पन्न (पती+पत्नी यांचे एकत्रित उत्पन्न) गटनिहाय पुढीलप्रमाणे आवश्यक राहील. तसेच वर्षाचा उत्पन्नाचा कालावधी दिनांक **०१/०४/२०१७ ते ३१/०३/२०१८** या कालावधीत झालेलया प्राप्तीवरून परिगणित (Calculate) करावा. कृपया उत्पन्नाबाबत अधिक स्पष्टता येण्यासाठी माहिती पुस्तिका पहावी.

- **अल्प उत्पन्न गट - (LIG) ₹ २५,००१/- ते ₹ ५०,०००/- पर्यंत**
- **मध्यम उत्पन्न गट - (MIG) ₹ ५०,००१/- ते ₹ ७५,०००/- पर्यंत**

५) अर्जदारास एका संकेतातील एकाच आरक्षण गटामध्ये एकापेक्षा जास्त अर्ज करता येणार नाहीत. तसेच एका पेक्षा जास्त उत्पन्न गटामध्ये अर्ज करता येणार नाहीत. असे आढळल्यास असे अर्ज सोडतीपूर्वी रद्द केले जातील.

६) **अर्ज सादर करताना अर्जदाराचे स्वतःचे नावे बँक खाते / क्रमांक असणे आवश्यक आहे. दुसऱ्याचे, एन.आर.आय., चालू खाते तसेच संयुक्त बँक खाते क्रमांक वापरता येणार नाही. या अटीचा भंग केल्यास असे अर्ज रद्द करण्यात येतील.**

७) अर्जदाराचे स्वत:चे पॅनकार्ड असणे आवश्यक आहे. पात्रतेसाठीच्या इतर अटी व शर्तीचा उल्लेख तसेच आरक्षण गटाचे विवरण इ. माहिती माहितीपुस्तिकेत विस्तृतपणे स्पष्ट करण्यात आली आहे. सर्व अर्जदारांनी माहितीपुस्तिकेचा सखोल अभ्यास अर्ज भरण्यापूर्वी करावा. माहितीपुस्तिका व अर्ज म्हाडाच्या ऑनलाईन अर्ज भरण्याचे संकेतस्थळ **https://lottery.mhada.gov.in** वर उपलब्ध राहील.

८) द नॅशनल ट्रस्ट फॉर द वेल्फेअर फॉर पर्सनल विथ ऑटीझम, सिरेब्रल पालसी, मेन्टल रिटार्डेशन अ‍ॅन्ड मल्टिपल डिसॅबिलीटीज, अ‍ॅक्ट १९९९ मधील प्रकरण ६ मधील कलम १३ ते १७ मधील तरतुदींच्या अधिन राहून गतीमंद (मेन्टल रिटार्डड) व मनोविकृत (मेन्टल इलनेस) या प्रवर्गातील अर्जदारांच्या वतीने संबंधित व्यक्ती / संस्था अर्ज करू शकतील व या स्वरूपाचे अपंगत्व असलेल्या व्यक्तीस सदनिकेचे वितरण करताना त्याचे वैयक्तिक उत्पन्न विचारात घेण्यात येईल.

९) प्रत्येक प्रवर्गाच्या पात्रतेसंबंधी तपशीलवार माहिती संकेतस्थळावर जारी केलेल्या ''माहिती पुस्तिकेत'' देण्यात आली आहे.

## ऑनलाईन अर्ज भरावयाची पद्धत

**सोडत २०१९ साठी अर्ज भरण्याची पद्धत खालीलप्रमाणे आहे :**

मुंबई मंडळाच्या सन २०१८ च्या सोडतीमधील अर्जदारांना पुन्हा नोंदणी करण्याची आवश्यकता नाही. असे अर्जदार पूर्वीच्या USER NAME व PASSWORD च्या आधारे अर्ज सादर करू शकतील. तथापि, नवीन अर्जदारांनी खालीलप्रमाणे नोंदणी करावी.

**टप्पा क्र. १ : अर्जदारांची नोंदणी**

- अर्जदाराने प्रथम **https://lottery.mhada.gov.in** या संकेतस्थळास भेट द्यावी.
- सर्वप्रथम अर्जदाराने स्वतःचे USER NAME नोंदणी करावे. हा USER NAME कायम लक्षात ठेवावा. अर्जदारांने नोंदणी करण्यासाठी खालील बाबीची माहिती तयार ठेवावी.

  १. स्वतःचे नाव, २. कौटुंबिक उत्पन्न, ३. अर्जदाराचे फोटो (स्कॅन केलेले स्वतःचे सुस्पष्ट पासपोर्ट आकारातील रंगीत व ठळक छायाचित्र असावे व ते ५० केबी पर्यंत JPG format मध्ये असावे), ४. पॅनकार्डचे तपशिल (पॅन क्रमांचे ऑनलाईन व्हेरिफिकेशन केले जाईल), ५. जन्मतारीख (पॅनकार्ड प्रमाणे), ६. व्यवसाय, ७. वैवाहिक स्थिती, ८. लिंग, ९. राहण्याचा पत्ता, १०. स्वतःचा भ्रमणध्वनी क्रमांक (शून्यापासून सुरू करू नये), ११. ई-मेल आयडी (टिपः सर्व कम्युनिकेशन हे ई-मेल व एसएमएस द्वारे करण्यात येणार असल्यामुळे ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक भरतांना काळजी घेणे आवश्यक आहे. १२. बँक खाते क्रमांक, १२.१ अर्जदाराकडे खाते जेथे आहे त्या बँकेचा आयएफएससी कोड किंवा एमआयसीआर कोड. १२.२. अर्जदाराच्या खात्याच्या रिक्त / रद्द केलेल्या चेकची स्कॅन केलेली प्रत/कॉपी.

**टप्पा क्र. २ : सोडतीसाठी ऑनलाईन अर्ज भरणे :-**

- वरील टप्पा १ नुसार नोंदणी केल्यानंतर नोंदीत अर्जदारास युजर नेम व पासवर्डचा वापर करुन लॉगइन करता येईल. नोंदणी करताना दिलेल्या माहिती अनुसार अनुज्ञेय उत्पन्नानुसार अर्ज करता येईल.
- अर्जदार नोंदणी करतेवेळी दिलेली माहिती "SUBMIT" करेपर्यंत "EDIT" करता येईल तसेच ते पाहता सुद्धा येईल.
- योजनेकरिता अर्ज करताना "APPLY FOR LOTTERY" या लिंक वर क्लिक करावे. असे केल्यानंतर अर्जदारास उत्पन्न गटानुसार अर्ज करावयाचे विविध योजना संकेत क्रमांकाची महिती दिसेल.
- यानंतर अर्जदाराला "APPLICATION FOR RESIDENTIAL ACCOMMODATION FORM" दिसेल. सदर फॉर्म भरताना अर्जदारास योजना संकेत क्रमांक, प्रवर्ग, रकमेचा भरणा करण्याची पद्धत इत्यादी माहितीसह इतर माहिती भरावयाची आहे. **(टिप : नोंदणी फॉर्ममधील सर्व माहिती "RESIDENTIAL ACCOMMODATION FORM" मध्ये आपोआप दिसेल.)**
- वरील सर्व माहिती भरल्यानंतर "SUBMIT" या बटनावर क्लिक करावे. बदल करावयाचे नसल्यास निश्चित "CONFIRM" या बटनावर क्लिक करावे. त्यानंतर तळाशी ''प्रिन्ट अक्नॉलेजमेंट इन इंग्लिश'' व ''प्रिन्ट अक्नॉलेजमेंट इन मराठी'' या पैकी अर्जदाराने योग्य पर्याय निवडून तेथे क्लिक केल्यास अर्जदाराने भरलेल्या अर्जाची एडिट न करता येणारी पीडीएफ (PDF) च्या स्वरुपात फाईल स्क्रिनवर दिसेल त्यावर १० अंकी अर्ज क्रमांक दिसेल. ही पीडीएफ (PDF) फाईल अर्जदार कुठेही सेव्ह करू शकतो व त्याची प्रिंट आऊट घेऊ शकतो.

**टप्पा क्र. ३ : अनामत रक्कम भरण्याची पद्धत :-**

**चारपैकी कोणत्याही पद्धतीद्वारे अनामत रक्कम जमा केली जाऊ शकते :**

**१.** डेबिट/क्रेडिट कार्ड, **२.** इंटरनेट बँकिंग, **३.** एनईएफटी/आरटीजीएस. **४.** फ्रीचार्ज मोबाईल अ‍ॅप.

**१.** NEFT/RTGS द्वारे अनामत रक्कमेचा भरणा करण्याच्या पद्धती : २.१ NEFT/RTGS अर्जदाराच्या बँक खात्यामधून बँकेमार्फत करण्याची पद्धती - Generate Slip घेऊन अर्जदाराने स्वत:चे खाते असलेल्या बँकेत जाऊन Generate Slip वर दिलेल्या खाते क्रमांक, बँकेचे नाव, बेनेफिशिअरी नाव, शाखेचे नाव व IFS Code अचूक माहिती टाकून NEFT/RTGS करावे. २.२ NEFT/RTGS स्वत:च्या खात्यामधून Internet Banking द्वारे करण्याची पद्धत - सर्व प्रथम अर्जदाराने Internet Banking चे लॉगिन करून Add Beneficiary वर क्लिक करून Generate Slip वरील माहिती जसे Branch Name, Bank Name, Beneficiary Name, Beneficiary Account Number व IFS Code ने Bank Account Add करावे व दिलेल्या रक्कमेचा भरणा करावा. **नोट : अर्जदाराने खाते क्रमांक टाकताना अचूकता ठेवावी किंवा दिलेल्या माहितीची पुन्हा पुन्हा शहानिशा करावी.**

**२.** ऑनलाईन/फ्री चार्ज मोबाईल अ‍ॅप द्वारे पेमेंट केल्यास सर्व्हिस प्रोव्हायडरने ठरविलेले शुल्क अर्जदारास अदा करावे लागेल. त्याची माहिती सॉफ्टवेअरमध्ये उपलब्ध आहे.

**३.** एकदा नोंदणी केल्यानंतर त्या अकांऊटद्वारे अर्जदार एकापेक्षा जास्त प्रवर्ग/योजनेसाठी पात्र असल्यास त्याला एकापेक्षा जास्त अर्ज भरता येईल.

**४.** ऑनलाईन पेमेंट करताना काही वेळेस तांत्रिक अडचणीमुळे अनामत रक्कम मंडळाच्या खात्यावर जमा न झाल्यास व पुन्हा 'दुबार' प्रयत्न करताना एका अर्जासाठी दोन वेळा अनामत रक्कम मंडळाच्या खात्यावर जमा झाल्यास याबाबत त्वरीत उपमुख्य अधिकारी / पणन यांच्या उपरोक्त नमूद केलेल्या पत्त्यावर संपर्क करावा. अशा प्रकारे दुबार भरणा केलेल्या रकमेच्या परतावा सोडतीनंतर करण्यात येईल.

**५.** ऑनलाईन पेमेंट करताना काही तांत्रिक अडचणीमुळे अनामत रक्कम मंडळाच्या खात्यावर जमा न झाल्यास त्यास मंडळ जबाबदार राहणार नाही.

**६. अर्जामध्ये विचारलेली माहिती अर्जदाराने जाणून बुजून अथवा अनावधनाने चुकीची दिल्याचे अर्ज तपासणीमध्ये आढळल्यास असे अर्ज रद्द ठरविण्यात येतील.**

## विशेष सूचना

**१.** सदर योजनेतील वितरणांस, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, विक्री, हस्तांतरण व सदनिकांची अदलाबदल) विनियम १९८१ व (जमिनीची विल्हेवाट) नियम १९८१ तरतूदी जशाच्या तशा (वेळोवेळी होणाऱ्या सुधारणांसह) लागू राहतील.

**२.** नियोजित प्रकल्पातील योजनांचे चटई क्षेत्रफळ, विक्री किंमत व सदनिकांची संख्या अंदाजित असून त्यामध्ये बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**३. सदनिकांच्या वितरणासाठी कोणालाही म्हाडाने प्रतिनिधी, सल्लागार व प्रॉपर्टी एजंट म्हणून नेमलेले नाही. अर्जदाराने कोणत्याही अशा व्यक्तीशी परस्पर व्यवहार करू नये, तसे केल्यास मुंबई मंडळ / म्हाडा कोणत्याही व्यवहारास / फसवणुकीस जबाबदार राहणार नाही.**

**४.** यशस्वी अर्जदार पात्र ठरल्यास अशा लाभार्थ्यांना महाराष्ट्र शासनांच्या नियमानूसार आवश्यक मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क अदा करावे लागेल. मुद्रांक शुल्क व वरीलप्रमाणे लागू असणारे कर भरणा केल्यानंतरच सदनिकेचे प्रत्यक्ष वितरण करण्यात येईल.

**५.** भारतीय संविधानाच्या कलम २४३ ब नुसार बाराव्या अनुसूचीमध्ये अंतर्भूत केलेल्या बाबींना वस्तु व सेवा करातून वगळण्यात आलेले आहे. सदर अनुसूचीमध्ये इमारत बांधकाम व भूवापराचे विनियम या बाबी अंतर्भूत आहेत. यानुसार सदनिकेची किमत परिगणित करतांना वस्तू व सेवा कराचा समावेश करण्यात आलेला नाही. भविष्यात वस्तु व सेवा कराबाबतची सूट रद्द केल्यास वस्तू व सेवा कराच्या समावेशामुळे सदनिकेची किंमत वाढल्यास या संदर्भात वाढीव भरणा करण्याची जबाबदारी यशस्वी व पात्र लाभार्थ्यांची राहील.

**६.** संगणकीय सोडतीत कोणत्याही प्रकारे मानवी हस्तक्षेप होऊ शकत नाही. याकरिता अर्जदारांना विनंती करण्यात येते की, अशा प्रकारच्या कोणत्याही प्रलोभनांना बळी पडू नये.

**७.** या योजनांतर्गत आलेला कोणताही अर्ज किंवा सर्व अर्ज कोणतेही कारण न देता नाकारण्याचा किंवा संपूर्ण जाहिरात रद्द करण्याचा अधिकार मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ यांनी राखून ठेवला आहे.

**८.** जाहिरात सोडतीच्या अनुषंगाने काही नवीन सूचना असल्यास तसेच **https://mhada.maharashtra.gov.in** तसेच **https://lottery.mhada.gov.in** या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतील.

**९.** अनुसूचित जाति, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती व विमुक्त जमातींच्या प्रवर्गातील लाभार्थींना जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र तसेच सत्यापित अहवाल सोडतीच्या दिनाकांपासून ६ महिन्यांच्या आत सादर करणे आवश्यक आहे. त्याशिवाय अनुसुचित जाती, भटक्या जमाती व विमुक्त जमातीच्या प्रवर्गातील लाभार्थींना सदनिकेचा ताबा दिला जाणार नाही.

**१०.** बांधकाम पूर्ण झालेल्या सदनिका ''जशा आहेत तशा स्थितीमध्ये'' तथापि त्या राहण्यायोग्य करून वितरीत करण्यात येतील.

**११.** इमारत क्र. ८ कोपरी पवई येथील सोडतीमध्ये समाविष्ट सदनिकांची दुरुस्ती पूर्ण झाल्यानंतर व इमारत सुस्थितीत असल्याची खात्री करूनच या सदनिकांचा ताबा देण्याची कार्यवाही करण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

**१२.** सदनिकांचे बाबतीत कोणत्याही न्यायालयामध्ये दावा प्रलंबित असल्यास अथवा यापूर्वी वितरण झाले असल्यास, पडताळणीअंती योग्य तो निर्णय घेण्यात येऊन सदरचा निर्णय अर्जदारावर बंधनकारक राहील.

**१३.** जाहिरातीमध्ये अनावधनाने झालेल्या किंवा छपाईच्या चुकांचा कोणत्याही प्रकारे अर्जदारास फायदा घेता येणार नाही.

**माहितीपुस्तिका व अर्जाचा नमुना दि. ०७/०३/२०१९ पासून संकेतस्थळावर उपलब्ध होईल.**

## अधिक माहितीसाठी संपर्क:

**'म्हाडा लॉटरी मदत केंद्र' मित्र कार्यालय, गेट नं. ३,**
**गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१**
**'म्हाडाचे अधिकृत संकेतस्थळास भेट द्या'**

**म्हाडाचे ऑनलाईन अर्जाकरिता संकेतस्थळः https://lottery.mhada.gov.in**
**हेल्पलाईन नं. : ९८६९९८८०००, ई-मेल : dycomktmb@gmail.com**

CPRO/A/124

दीपेंद्र सिंह कुशवाह
मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ

*गृहनिर्माण क्षेत्रात देशातील अग्रगण्य संस्था - म्हाडा*